अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

# NOTICE

Displayed on- 15/12/2021 16 DEC 2021 Notice No. / 274

## कनिष्ठ महाविद्यालय जात संवर्गातील (कॅटेगरी) विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिप फॉर्म भरणेबाबत अत्यंत महत्वाची सूचना

शै.वर्ष २०२१—२२ एस.सी, एस.टी, एन.टी, ओ.बी.सी, व एस.बी.सी या जातसंवर्गातील विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवर दि. १५/१२/२०२१ पासून स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेकरिता वेबसाईट सुरु झालेली आहे. तरी, विद्यार्थ्यांनी **www.mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर शिष्यवृत्तीचे फॉर्म भरावेत.

ऑनलाईन फॉर्म भरणेकरीता खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. विद्यार्थ्याचा स्वत: च्या नावाचा जातीचा दाखला.
२. सन २०२०—२१ मधील मा. तहसिलदार यांचा वडीलांच्या नावे उत्पन्नाचा दाखला एस.सी, एस.टी या कॅटेगरीसाठी साठी स्कॉलरशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा रु.२,००००० /— आहे (दोन लाख ) व एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी.या कॅटेगरीसाठी स्कॉलरशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा १,००००० /— आहे. (एक लाख) एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी. या कॅटेगरीसाठी फ्रिशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा रु.८,००००० /— पर्यंत आहे.
३. वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडिलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स.
४. आधारकार्ड झेरॉक्स.
५. आधारकार्डला बँकखाते व मोबाईल नंबर संलग्न असणे आवश्यक
६. मागील वर्षीचे मार्कशिट.
७. गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हीट आवश्यक.
८. डोमासाईल सर्टिफिकेट.
९. १० वीच्या एल.सी. ची झेराक्स जोडावी.
१०. स्वत:चे राष्ट्रीयकृत बॅकेत खाते असलेले बॅकपासबुक. ( आयएफएससी कोड व एमआयसीआर कोड नंबरचा पहिल्या

पानावर शिक्का असणे आवश्यक आहे.)

११. रेशनकार्ड झेरॉक्स. (पहिले पान व कुटंबाचे नाव असलेले पान)

१२. ऑनलाईन प्रवेशाचे चलन झेरॉक्स.

१३. महाडीबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्र अपलोड करावे.

१४. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरतांना करंट डिटेल या कॉलममध्ये फी पेड या झिरो (शून्य ) टाकणे. अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेजची फी सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास पुन्हा महाविद्यालयाकडे रक्कम भरावी लागेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

१५. स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट डिटेल या कॉलममध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्रॅंट मध्ये असेल तर **Aided** टाकावे व नॉनग्रॅंटमध्ये प्रवेश असेल तर **UnAided** असे टाकावे. तसेच कॉलेजचे नाव बरोबर सिलेक्ट करावे.

१६. विद्यार्थ्यांनी एका वेळी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरावा. जर एखाद्या विद्यार्थ्याने दोन्ही योजनेचा फॉर्म भरल्यास व त्यातील एका योजनेचा फॉर्म रिजेक्ट होऊन सदर विद्यार्थ्यास कमी लाभ मिळाल्यामुळे महाविद्यालयाची फी भरावी लागल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची विद्यार्थ्यांनी गांभिर्याने नोंद घ्यावी व कोणत्याही एकाच योजनेसाठी अर्ज करावा.

१७. कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव सिलेक्ट करावे.

**Junior College - Tuljaram Chaturchand College (27250211827)**

**Vocational (Jr.College) - MCVC ANEKANT EDUCATION SOCIETY'S TULJARAM CHATURCHAND COLLEGE (2765211090)**

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व वरील कागदपत्रे स्वत:जवळ ठेवावीत महाविद्यालयात जमा करु नये. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश फी सवलतीत झालेला आहे, अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशिपचा फॉर्म भरला नाही, तर संबंधित विद्यार्थ्यांच्या होणा–या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील, याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 2020-21\Scholarship Notice 2020-21\Scholarship Notice New 2020-21.docx